# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२६/M/००००८०**

**अपिलार्थी श्री. धनजंय सावंत**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**

शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र विनाअनुदानित
खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था, शासकीय तंत्र निकेतन इमारत,
रुम नं. ३०५, ३ रा मजला, खेरवाडी, बांद्रा, मुंबई ४०००५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**

शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र विनाअनुदानित
खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था, शासकीय तंत्र निकेतन इमारत,
रुम नं. ३०५, ३ रा मजला, खेरवाडी, बांद्रा, मुंबई ४०००५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.१०.२०२६</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.१०.२०२५ | १४.११.२०२५ | २४.११.२०२५ | २४.१२.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.०१.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १४.११.२०२५ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २४.१२.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ३१.१०.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-

*(१) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतनपत्रक (बँक स्टेटमेंटसह) सन २०२३-२४, २०२४-२५ व २०२५- २६.*

*(२) महाविद्यालयाचे बजेट - सन २०२३-२४, २०२४-२५ व २०२५- २६.*

*(३) सर्व प्रतिज्ञापत्रे (Affidavits).*

*(४) A-१ व A-२ फॉर्म.*

*(५) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे फॉर्म १६ ची प्रत सन २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६.*

*(६) प्राप्तिकर भरलेली चलने (Income Tax Paid Challans) सन २०२३- २४ व २०२४-२५.*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.११.२०२५ रोजी अपिलार्थींना कळविले की, JAYAWANTRAO SAWANT COLLEGE OF ENGINEERING, PUNE (EN६१४५) यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२५-२६ साठी "नो अपवर्ड रिव्हीजन" केल्याने शुल्क निर्धारणाचा प्रस्ताव सादर केलेला नाही.

JAYAWANTRAO SAWANT COLLEGE OF ENGINEERING, PUNE (EN६१४५) यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी ऑनलाईन सादर केलेल्या प्रस्तावातील माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५, मधिल कलम ११(१) नुसार संबंधित संस्थेस विचारणा करुन माहिती देणे आवश्यक आहे. त्यानूसार संबंधीत संस्थेस विचारणा करुन त्यांचे उत्तर प्राप्त झाल्यावर आपणांस माहिती देणेबाबत निर्णय घेण्यात येईल.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २४.११.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.१२.२०२५ रोजी अपिलार्थी यांनी मागितलेली इंजिनिअरींग अभ्यासक्रमाच्या प्रस्तावातील माहिती मध्ये इतर एम.ई.एम.बी.ए. व एम.सी.ए. अभ्यासक्रमाची एकत्रित माहिती असून, ती माहिती कर्मचाऱ्यांची वैयक्तिक स्वरुपात असल्याने ती माहिती अधिकारात प्रकट करता येत नाही. संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावात अपिलार्थी यांची वैयक्तिक माहिती नाही त्यामुळे संस्थेने सादर केलेली इतर माहिती, त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने माहिती अधिकार कायदा कलम ११(१) नूसार अपिलार्थी यांना देता येत नाही असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. अपिलार्थींनी व्दितीय अपील सादर करताना वकालतनामा सादर केलेला आहे. तथापि, सुनावणी वेळी अपिलार्थी व त्यांचे अधिवक्ता अनुपस्थित आहेत.

६. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी अपिलार्थींना दि.१४.११.२०२५ रोजी स्पष्ट उत्तर कळविले होते. तसेच त्यांनी संबंधीत संस्थेस माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा कसे असे कळविले. त्यावर संस्थेने कळविले की, आमचे जे. एस. पी. एम. चे जयवंतराव सावंत कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, हडपसर, पुणे, ४११०२८ (EN६१४५) हे कायम विनाअनुदानित तत्वावर आहे. मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे यांचे समोरील अपिल क: ५३२६/२०१४/पुणे दि.१३.०६.२०१६ च्या आदेशानुसार मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपुर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ३१५२/२००८ नगर युवक शिक्षण संस्था व यशवंतराव चव्हाण अभियांत्रीकी महाविद्यालय, वनडोंगरी, नागपूर विरूध्द राज्य माहिती आयोग, नागपुर खंडपीठ या प्रकरणी दि. २०.०८.२००९ रोजी अशा प्रकारची खाजगी संस्थेची विनअनुदानित महाविद्यालये माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) प्रमाणे "सार्वजनिक प्राधिकरण" च्या व्याख्येमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत असा निर्णय दिलेला आहे हे न्यायनिर्णय विचारात घेता आमच्या संस्थेस वा महाविद्यालयास माहिती अधिकार कायदा लागु होत नाही.

तसेच अर्जदार धनंजय उत्तम सावंत हे आमच्या शैक्षणिक संस्थेशी वा महाविद्यालयाशी संबंधीत (विद्यार्थी, पालक किंवा कर्मचारी) नाहीत. FRA Act प्रमाणे सदरील अर्जदारास कोणत्याही प्रकारचे अधिकार नसल्यामुळे सदरील अर्जदारास कोणत्याही प्रकारची माहिती देण्यास आम्ही वांधील नाही. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

..३/-

७. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपिलार्थींना उत्तर देण्यात आलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १४.१०.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ